# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 27/11/2019 (बुधवार)
# (सायंकाळ)

---

## टायर गोडावुन फोडणारे गजाआड
## स्थानिक गुन्हे शाखेची कार्यवाही

दिनांक 27/11/2019 रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोस्टे खापरखेडा हद्दीत फरार/पाहीजे आरोपी शोध कामी फिरत असता सदर पथकाला बातमीदाराकडुन टायर गोडावुन फोडुन टायर चोरी करणाऱ्या चोरांची माहीती मिळताच सदर पथकाने शिताफीने वार्ड क्र 1, जयभोले नगर, खापरखेडा येथे राहणारे 1) राहुल उर्फ वडा तिलकचंद गुप्ता, वय 19 वर्ष व 2) उमेश उर्फ तोता बंसनारायण पाल, वय 19 वर्ष यांना ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्यांनी दिनांक 16/11/19 चे रात्री दरम्यान खापरखेडा मेन रोडवरील सोनु सायकल स्टोर्सचे गोडावुनचे वरचे टिनाचे पत्रे काढुन 14 नग मोटरसायकलचे टायर व मोपेडचे टायर किंमत 15,100/- रू. चे चोरी केल्याचे कबुली दिल्याने त्याचे जवळुन 14 नग चोरी केलेले मोटरसायकल व मोपेड गाडीचे टायर एकुण किंमती 15,100/- रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आरोपी व जप्त मुद्देमाल पुढील कार्यवाही करीता पोस्टे खापरखेडा चे ताब्यात दिले.

सदरची कामगीरी मा. पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अपर पोलीस अधिक्षक श्रीमती मोनिका राउत यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अनिल जिट्टावार यांचे नेतृत्वात सहायक फौजदार लक्ष्मीप्रसाद दुबे, पोहवा सुरज परमार, निलेश बर्वे, पोना सत्यशिल कोठारे, शैलेश यादव, पो.शि प्रणय बनाफर, विरेंद्र नरड, चालक पो.ना अमोल कुथे यांना पार पाडली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर